गोपनीय/अतितात्काळ

क्र. पोमसं/२/१०२०/मो. प./नि.सु. १४-१५/१२/२०१६.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- ~~१०~~ १२ /०४/२०१७.

**संदर्भ** :- शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे-०८१६/प्र. क्र. १९५/पोल-१ अ, दि.०७/०४/२०१७ (प्रत संलग्न केली आहे).

**विषय** :- पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन पदावर पदोन्नतीने पदस्थापना...

* * * * * *

पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन ह्या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र मोटार परिवहन पोलीस निरीक्षकांच्या सन २०१४-१५ च्या निवडसूचीवरील **श्री. अनिल मधुकरराव देशमुख, पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन यांना सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन, नागपूर आयुक्तालय** या पदावर पदोन्नतीने पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश यासोबत कळविण्यात येत आहेत :-

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. प्रस्तुत अधिका-याविरूध्द आता गुन्हा दाखल झाला असेल, किंवा खात्यांतर्गत शिक्षेचे आदेश निर्गमित झाले असतील, किंवा त्यांना निलंबित केले असल्यास संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नती बहाल न करता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ कळवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी.

आ. पदोन्नती आदेशाधिन अधिकारी नवीन पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याची तारीख संबंधीत घटक प्रमुखांनी तात्काळ या कार्यालयास कळवावी.

इ. अधिकारी जर पदोन्नतीवर तातडीने हजर झाले नाहीत, तर तसे या कार्यालयास कळवावे आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दि. १६/०९/१९८३, ११/०१/१९८४ व १०/०२/१९९१, तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दि. १३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

ई. प्रस्तुत आदेशांतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकांच्या प्रथम पृष्ठ, व पदभार हस्तांतरण प्रमाणपत्राच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

उ. पदोन्नतीवर पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, अथवा अन्य न्यायालयाचे स्थगित आदेश असल्यास ते विचारात घेऊन उक्त अधिका-यास पदोन्नतीवर पदस्थापना देण्यात यावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, नागपूर शहर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

E:\DESK-२\२०१५-१६\०१. आदेश.docx

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
( **लक्षवेध :- श्री. प्र. मो बलकवडे,** कक्ष अधिकारी)

प्रत, सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

प्रत :-

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३-अ, ९, ११, १४-अ, ३६ व ४०.
पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. प्रस्तुत पदोन्नती आदेश **"पोलीस उप अधीक्षक, मोटार परिवहन २०१४-१५"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील एक महिन्यासाठी प्रसिध्द करावे.

<u>निवडसूची सन २०१४-१५.</u>
पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना....

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

शासन आदेश क्र.रापोसे-०८१६/प्र.क्र.१९५/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :-७ एप्रिल, २०१७.

<u>वाचा</u> :- पोलीस आस्थापना मंडळ क्र.१ यांची चक्रीय पध्दतीने केलेली शिफारस.

<u>शासन आदेश</u> :-

पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१४-१५ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन संवर्गातील खालील अधिकाऱ्यास"महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २८.४.२०१५ आणि दि. १६.७.२०१५ रोजीच्या, अधिसूचनेतील तरतुदीनुसार महसुली विभागीय संवर्गाचे वाटप करण्यात आले आहे. सदर महसुली विभाग वाटपानुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन या पदावरील नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. अनिल मधुकरराव देशमुख | नागपूर शहर | पोलीस उप अधीक्षक, मोटार परिवहन विभाग, नागपूर शहर आयुक्तालय |

२. उपरोक्त अधिकाऱ्याविरूध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबित / प्रस्तावित असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार, त्यांच्याविरूध्द प्रलंबित / प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती त्यांना शिक्षा झाल्यास, सदर शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

३. उपरोक्त पदोन्नती, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र: २७९७/२००४ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४. पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यांस पदस्थापना देण्यात यावी.

५. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांस, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

- महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
- मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
- मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
- अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
- प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
- प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
- अपर पोलीस महासंचालक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
- पोलीस आयुक्त, नागपूर
- जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
- संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत),
- निवडनस्ती / पोल-१(अ).